माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, खंडपीठ अमरावती**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १८ (१) अन्वये**
**प्राप्त झालेली तक्रार**
**तक्रार क्रमांक : ६५/२०२२**

**तक्रारकर्ता, श्री.गजानन सदाशिव पवार,**
**मु.पो.मुळावा, ता.उमरखेड, जि.यवतमाळ**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम उपविभाग, उमरखेड, ता.उमरखेड, जि.यवतमाळ**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद, ता.पुसद, जि.यवतमाळ**

**तक्रार अर्जावरील सुनावणी दिनांक : ०२.११.२०२३**

**तक्रारकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : अनुपस्थित**
**प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित**

| द्वितीय अपील आदेशाचा दिनांक | आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा दिनांक | मूळ तक्रार अर्जाचा दिनांक |
|---|---|---|
| २४.०४.२०१७ | - | ०९.०३.२०२२ |

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) नुसार द्वितीय अपील क्र.१७४८/२०१६ दि. २४.०४.२०१७ रोजी पारित केलेल्या आदेशानुसार कार्यवाही न झाल्यामुळे आयोगाकडे तक्रार दाखल केलेली आहे. सदर तक्रारीवर दिनांक ०२.११.२०२३ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली. त्यानुसार आज रोजी सुनावणी दरम्यान तक्रारकर्ता श्री.गजानन सदाशिव पवार उपस्थित आहेत. उत्तरवादी अनुपस्थित आहेत.

तक्रारकर्ता यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगात दाखल केलेल्या द्वितीय अपील (अपील क्र. १७४८/२०१६) मध्ये दिनांक २४.०४.२०१७ रोजी " अपिलकर्ता श्री.गजानन सदाशिव पवार, यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुसद यांच्याकडे दाखल केलेल्या प्रथम अपिल अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश प्राप्त झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेवुन समन्यायिक आदेश पारीत करावेत. याकरिता अपिलार्थीला लेखी सुचना देऊन सुनावणी आयोजीत करावी. सुनावणीची लेखी नोटीस संबंधितांना बजावुन दोन्ही पक्षांची बाजु ऐकुण घेऊन स्वयंस्पष्ट आदेश पारीत करावेत." असे आदेश पारित केले होते.

राज्य माहिती आयोग यांचे कार्यालय सत्यमेव जयते अमरावती विभाग, अमरावती

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व तक्रारकर्ता यांचे युक्तीवादावरुन असे निदर्शनास येते की, अपिलार्थी श्री.गजानन पवार यांनी दाखल केलेल्या व्दितीय अपिल क्र.१७४८/२०१६ यावर दि.२४.०४.२०१७ रोजी पारीत केलेल्या आदेशात प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नसल्यामुळे वरील आदेश प्राप्त होताच दोन्ही बाजुंना सुनावणीची संधी देत आदेश पारीत करण्याचे आदेशीत केले होते. मुळात वरील मागितलेली माहिती शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, उमरखेड हे ज्या योजनेअंतर्गत सुरू करण्यात आली, त्यावर आवंटीत निधी, तसेच बांधकामाबाबतचा संपूर्ण तपशिल, निधीचा विनियोग इत्यादी बाबतची माहिती विचारली असून, प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांना सुनावणीस त्यांनी दि.०७.०३.२०२२ रोजी तक्रार अर्ज दाखल केल्यानंतर तब्बल १ वर्ष म्हणजे २०२३ साली प्रथम अपिल अर्जाच्या सुनावणीसाठी पाचारण करण्याची सुचना आली व प्रत्यक्षात त्यांना सुनावणीची संधी न देता आदेश पारीत करण्यात आला, असल्याचे नमूद केले आहे. ही बाब अतिशय गंभीर असुन आयोगाच्या दि.२४.०४.२०१७ रोजीच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे समन्यायीक आदेश पारीत करतांना अपिलार्थी यांना लेखी सुचना देवुन सुनावणी आयोजीत करावी व दोन्ही पक्षांची बाजु ऐकुण स्वयंस्पष्ट आदेश पारीत करावा, असे आदेशीत केले होते. मुळात मागितलेली माहिती ही शासकीय कार्यालयाच्या बांधकामाकरिता, शासकीय योजनेतुन आवंटीत शासकीय निधीशी संबंधित असल्याने वरील माहिती उघड करणे हे सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेवर बंधनकारक असुन कलम ४(१) अन्वये वरील माहिती स्वयंप्रेरणेने स्वत: हुन उघड करणे अपेक्षित असून अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या जोडपत्र अ नुसार संपूर्ण माहिती त्यांनी तात्काळ व विनामुल्य प्रदान करण्याचे निर्देशासह तसेच दि.२४.०४.२०१७ रोजी पारीत केलेल्या आदेशाचे तब्बल ६ वर्षापर्यंत अनुपालन न केल्यामुळे संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी यांचेविरुध्द दि.३१.०५.२००८ व १० जुन २००८ च्या परिपत्रकानुसार तसेच कलम १९(८)(ग) व २०(१), २०(२) अन्वये प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द कठोर कार्यवाही का करण्यात येवु नये, याचाही खुलासा सादर करावा. दरम्यान वरील आदेश प्राप्त होताच २ आठवडयाच्या कालावधीत उपलब्ध असलेली जोडपत्र अ मध्ये नमूद केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करावी.

## अंतरिम आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेश प्राप्त होताच २ आठवडयाच्या कालावधीत उपलब्ध असलेली जोडपत्र अ मध्ये नमुद केलेली संपुर्ण माहिती अपिलार्थीस तात्काळ विनामुल्य प्रदान करावी.

२. परिच्छेद क्र.३ मध्ये नमुद केल्याप्रमाणे संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा लेखी खुलासा सदर आदेश प्राप्त होताच २ आठवडयाच्या आत आयोगास सादर करावा.

३. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत संबंधित प्रथम अपिलीय अधिकारी व जन माहिती अधिकारी यांना पुरवावी.

(राहुल भा.पांडे)
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ अमरावती**

**ठिकाण : अमरावती**
**दिनांक : ०२.११.२०२३**

जावक क्रमांक ८०९ दिनांक 03 JAN 2024